कक्ष ११, गुन्हे शाखा, मुंबई. दिनांक १४/०६/२०२६

**-: प्रेस नोट :-**

**'' नशेसाठी कोडेन फॉस्फेटयुक्त सिरप एकुण ४७३४ बाटल्या किं रु ५२,०७,४००/- चा अंमली पदार्थ साठा करुन विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्या चार आरोपीत इसमांविरुध्द एनडीपीएस कायदयांतर्गत कारवाई केलेबाबत .''**

**--**

दिनांक १३/०६/२०२६ रोजी १४.०० वा चे सुमारास रजियादेवी गजानंद गुप्ता जल तृप्ती केंद्र समोर, एस.व्ही.रोड, इंडीयन ऑईल पेट्रोलपंपसमोर, मालाड (प.) मुंबई येथे चार इसम त्यांचे ताब्यात कोडेन फॉस्फेट युक्त सिरपच्या एकूण १५३ बाटल्या नशेसाठी वापरण्याकरीता विक्री करण्यासाठी आणलेल्या असताना कक्ष ११ गु.प्र.शा.गु.अ.वि., कांदिवली (प), मुंबई चे गस्ती वरील पथकाने त्यांना जागीच अटकाव करुन इसम क्र १) वय २६ वर्षे, २) वय २३ वर्षे, ३) वय २६ वर्षे, व ४) वय १७ वर्षे (विधीसंघर्षग्रस्त बालक) यांना ताब्यात घेवून त्यांचे विरुध्द फिर्यादी नामे श्री नरेश वरठा पोशिक्र ११०८२८/गुशा यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मालाड पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. १०३७/२०२६ कलम ८(क) सह २२(क), २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ अन्वये गुन्हा नोंद करुन गु.प्र.शा., गु.अ.वि. कक्ष -११, वि.स्था.गु.नों.क्र. ९४/२०२६ अन्वये तपास सुरु केला.

सदर तपासादरम्यान पोलीस पथकाने आरोपीतांकडे केलेल्या सखोल चौकशीदरम्यान निष्पन्न झाले की, यातील एक आरोपीत याचे खारघर, नवी मुंबई येथे गोडावून असून त्याठीकाणी अश्याच प्रकारच्या कोडेन फॉस्फेट युक्त सिरपच्या बाटल्या बेकायदेशिरपणे मोठया प्रमाणात साठवणूक करुन ठेवल्या आहेत. म्हणून लागलीच पोलीस तपास पथकाने आरोपीसह खारघर, नवी मुंबई येथे जावून छापा कारवाई करुन तेथून कोडेन फॉस्फेट युक्त सिरपच्या एकूण ४५८१ बाटल्या जप्त केल्या आहेत.

सदर कारवाई व तपासादरम्यान एक मोटार सायकल किंरु १,००,०००/- व एकूण ४७३४ कोडेन फॉस्फेट युक्त सिरपच्या बाटल्या किं रु ५२,०७,४००/- असा एकूण ५३,०७,४००/- रू. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून कक्ष ११ गु.प्र.शा.गु.अ.वि., कांदिवली (प), मुंबई कडून पुढिल तपास करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्णकांत उपाध्याय, पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण-१) नवनाथ ढवळे, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-उत्तर) माणिक बेद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली, कक्ष ११ गु.प्र.शा. गु.अ.वि. कांदिवली (प), मुंबईचे पोलीस निरीक्षक गणेश माळी, पोनि बाबासाहेब काकडे, पोनि रघुनाथ पाटील, मसपोनि निलोफर शेख, सपोनि दादासाहेब बनसोडे, सपोनि अमित पाटील, पोउनि बाळासाहेब शिंदे, स.फौ. गवस, नावगे, सुर्वे, पोह खांडेकर, कांबळे, निजाई, गोवळकर, खताते, जाधव, चव्हाण, मपोह लाडे, पोशि वरठा, मेऱ्या, सानप, मपोशि जाधव यांनी पार पाडली आहे.

***** D-1/ /2026*****